**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. ०१ चा पुढील सरतपास शपथेवर सुरु श्री कौटकर वकिलांमार्फत.**

२) माझे प्रतिज्ञापत्र माझे वकिलांनी माझ्या सांगण्याप्रमाणे तयार केले असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. ते निशाणी क्र. ०७ वर आहे.

मी प्रस्तुत प्रकरणात खालीलप्रमाणे दस्ताऐवज दाखल केलेले आहेत.

१. माझ्या वडिलांच्या मृत्युप्रमाणपत्राला आर्टिकल अ देण्यात येते.

- माझी आई शांताबाई गणपतराव लाड यांच्या मृत्यु प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रतीला **निशाणी क्र. ११** देण्यात येते.
- सर्वे क्रमांक १५१ व सर्वे क्रमांक १६/१ च्या सातबारा उता–यांना अनुक्रमे **निशाणी क्र. १२ व १३** देण्यात येते.
- नमुना ८ अ च्या प्रमाणित प्रतीला **निशाणी क्र. १४** देण्यात येते.
- दोषारोपपत्र क्रमांक ५७/२०१७ मधील दोषारोपपत्राला **निशाणी क्र. १५** देण्यात येते.
- दोषारोपपत्र क्रमांक १८८/२०१८ मधील दोषारोपपत्राच्या प्रमाणित प्रतीला **निशाणी क्र. १६** देण्यात येते.
- अदखलपत्र गुन्हा क्रमांक २१९/१७ च्या प्रतीला **आर्टिकल ब** देण्यात येते.
- कापुस विकल्याबाबतच्या पावतीच्या प्रतीला **आर्टिकल क** देण्यात येते.

**गैरअर्जदारांचा पुकारा केला. परंतु ते गैरहजर राहिले. गैरअर्जदारांच्या विरुध्द प्रकरण एकतर्फा चालविला असल्यामुळे प्रकरण साक्षीदाराच्या उलट तपासाविना पुढे चालविण्यात येते.**

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष

दिनांक – १६/१२/२०१९.
कळमेश्वर

( एच.एन. पोले )
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.२, कळमेश्वर.

**प्रमाणपत्र**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील साक्षपुरावा हे मुळ साक्षपुराव्या प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – आर.एम. परमाल (नि.श्रे.)